वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३२ अंक-१२ किंमत : रु. ३०/- डिसेंबर २०२४



महाराष्ट्राचे नूतन मुख्यमंत्री **मा.ना. देवेंद्रजी फडणवीस,**
उपमुख्यमंत्री **मा.ना. एकनाथजी शिंदे** व उपमुख्यमंत्री **मा.ना. अजितदादा पवार**
यांचे महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) यांचे वतीने हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा..!

**डॉ. आण्णासाहेब टेकाळे**

**अध्यक्ष**

# नूतन आधारस्तंभ यांचे अभिनंदन

## डॉ. हंसराज वैद्य

**पत्ता** : वैद्य रुग्णालय, पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर, वजिराबाद चौक, नांदेड - ४३१ ६०१.

**मोबा.** : ९४२३१३८३८५, ७८८७८३३९१८

**पद** : अध्यक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग उत्तर मराठवाडा.

---


## श्री. राजीव तुकाराम कुलकर्णी

**पत्ता** : रु. ए/४१, विष्णु अबान पार्क, ढोकाळी नाका, कोलशेत रोड, ठाणे (प.) ४०० ६०७.

**मोबा.** : ९९८७५५९५००

**पद** : फेस्कॉम समिती प्रमुख जनसंपर्क व माध्यम सल्लागार समिती
माजी सहसंपादक, लोकसत्ता.

---



## प्रा. दुष्यंत आणणासाहेब पाटील

**पत्ता** : हायस्कूल रोड (पूर्व), चांदोली वसाहत (उत्तर), मु.पो. येलूर, ता. वाळवा, जि. सांगली.

**शिक्षण** : M.P.Ed., N.S.N.J.S.

**पद** : अध्यक्ष, येलूर ज्येष्ठ नागरिक संघ
कोषाध्यक्ष, वाळवा तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती.

---

**'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा**



सोलापूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती कार्यशाळेत मार्गदर्शन करताना फेस्कॉम अध्यक्ष मा. डॉ. आणणासाहेब टेकाळे



रामवाडी (नांदेड) येथील **श्रीमती कोंडाबाई जळबा पाटील (वय १०२)** यांचा डॉ. श्वेता संजय घोलप यांच्या हस्ते सत्कार. सोबत महिला पदाधिकारी.



इंटरनॅशनल लॉजिव्हिटी सेंन्टर इंडिया तर्फे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक श्री. जयंत उमराणीकर, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम व कुलगुरु डॉ. विवेक सावजी यांचे उपस्थितीत जीवन गौरव पुरस्कार स्विकारताना माजी अध्यक्ष अरुण रोडे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
वाहतूक खाते, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दूरध्वनी क्र.०२२-२३०२३१००. e mail: gmtraffic@msrtc.gov.in

क्र.राप/वाह/सवलत/ ४४०८ दिनांक: ०४/१२/२०२४

प्रति,
प्रादेशिक व्यवस्थापक, संनियंत्रण समिती क्र. १, २, ३ व ४
विभाग नियंत्रक,
रा.प.मुंबई/पालघर/रायगड(पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/छत्रपतीसंभाजीनगर/बीड/जालना/लातूर/नांदेड/अमरावती/धाराशिव/परभणी/नागपूर/भंडारा चंद्रपूर/ वर्धा/ गडचिरोली/ अकोला /यवतमाळ/बुलडाणा विभाग.

विषय:-ज्येष्ठ नागरिक सवलतीकरिता ग्राहय धरण्यात येणा-या ओळखपत्रांबाबत.
संदर्भ:- १.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/अ.जे.ना./२२१२, दि.२५.०८.२०२२
२.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/४३५, दि.३१.०१.२०२३

-----

गृह विभाग शासन निर्णय क्र.एसटीसी-०८२२/प्र.क्र.२१८/परि-१, दिनांक ०६.०९.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्यातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये मोफत प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षे ते ७५ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये ५०% प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या परिपत्रक क्र.०८/२०२२,क्र.राप/वाह/सवलत/अ.जे.ना/२२१२, दि.२५.०८.२०२२ व पत्र क्र.राप/वाह/सवलत/४३५,दि.३१.०१.२०२३ अन्वये ज्येष्ठ नागरिकांना रा.प.बसेस प्रवासभाड्यात सवलतीकरीता आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, केंद्र/राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांना दिलेली ओळखपत्र, [मात्र त्यावर फोटो, जन्मतारीख, रहिवासी पत्ता अनिवार्य आहे.] पासपोर्ट, ड्रायव्हींग लायसन्स, पॅनकार्ड, तहसिलदार यांनी दिलेले ओळखपत्र, डिजी लॉकर, एम आधार व रा.प.महामंडळाद्वारे देण्यात आलेले स्मार्टकार्ड ही ओळखपत्रे ग्राहय धरणेबाबत सर्व विभागीय कार्यालयास कळविण्यात आले आहे.

परंतु वाहकांद्वारे वरील नमूद ओळखपत्रे ज्येष्ठ नागरिक प्रवास करतेवेळी नाकारत असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत.

तरी आपणांस पुन:श्च याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमूद ओळखपत्रांच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्याबाबतच्या सुचना आपणाद्वारे आगार व्यवस्थापक यांस देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत ज्येष्ठ नागरिक तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

जा. क्र.राप / विनिप / वाह / प्रशा /७३६३
रा. प. विभागीय कार्यालय पुणे
दिनांक ०५.१२.२०२४

प्रत रवाना -
आगार व्यवस्थापक रा. प. शिवाजीनगर / स्वारगेट / भोर / नारायणगांव / राजगुरुनगर / तळेगांव / शिरूर / बारामती/ इंदापूर / सासवड / दौण्ड / पिंपरी-चिंचवड./ बारामती एमआयडीसी/मंचर आगार यांना वरीलप्रमाणे माहिती व कार्यवाहीसाठी . वरील पत्रात दिलेल्या सूचनेनुसार नमुद ओळखपत्रांच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्याबाबतच्या सूचनांची कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत ज्येष्ठ नागरिक तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

विभाग नियंत्रक
रा.प.पुणे.

धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पध्दतीने उपलब्ध करुन देण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय विशेष मदत कक्षासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समिती २७२४/ प्र.क्र.१३/का.१५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२४

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक-एमईडी-१०२३/प्र.क्र.१४/शिक्षण-२, दिनांक ०५/०७/२०२३
२) शासन शुध्दीपत्रक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक-एमईडी-१०२३/प्र.क्र.१४/शिक्षण-२, दिनांक १४/०७/२०२३
३) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र.लवेसू-२०१०/७३/(११)/ का. १५, दिनांक २२/०७/२०१०
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. धसंरु-२०१२/प्र.क्र.३८९/आ-६, दिनांक१९/११/२०१२
५) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र.बीपीटी-२०१२/प्र.क्र.७८/१२/ का. १५, दिनांक २८/०५/२०१४

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ अअ मधील तरतुदी व त्यानुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ३१३२/२००४ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरीता मा. उच्च न्यायालयाने योजना तयार केली आहे. त्यानुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयातील एकूण कार्यान्वीत खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे या रुग्णालयांना बंधनकारक आहे.

२. धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पध्दतीने तातडीने उपलब्ध होण्याकरिता राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष सुरु

करण्यात आला आहे. सदर राज्यस्तरीय मदत कक्षाकरिता टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पध्दतीने तातडीने उपलब्ध होण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय विशेष मदत कक्षासाठी १८००१२३२२११ हा टोल फ्री क्रमांक दि. २९/०२/२०२४ च्या बैठकीत मान्य झाल्यानुसार उपलब्ध करून देण्यात आला आहे.

२. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयामार्फत M/s. SAAR IT RESOURCES Pvt. Ltd. या कंपनीकडून राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाकरिता धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या नावाने सदर टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आलेला असून, सदर कंपनीकडून २ Resource person सदर प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात येत आहेत. सदर २ Resource person च्या शूल्कासंदर्भात विधि व न्याय विभाग व माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून एकमताने ठरविण्यात येईल.

३. टोल फ्री कॉल सेंटरवर नियुक्त अधिकारी /कर्मचारी ह्यांनी तांत्रिक, वैज्ञानिक आणि शास्त्रीय दृष्ट्या सक्षम राहून सभ्य, सुसंस्कृत आणि सौम्य भाषेत सहकार्याच्या भावनेने जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणे अपेक्षित आहे.

४. या कॉल सेंटरकरिता टोल फ्री क्रमांकासाठी होणारा खर्च "मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, (००) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (२०५२ ५११६) या लेखाशिर्षाखाली १७ संगणक खर्च" या उद्दिष्टांतर्गत असलेल्या निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल. याकरिता कार्यासन अधिकारी (का.२०), विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१५१४०७४९००१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SACHIN
DATTATRAY
KASTURE

(सचिन द. कस्तुरे)
अवर सचिव (विधि), महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
वाहतूक खाते, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०००0८
दूरध्वनी क्र.०२२-२३०२३९००. e mail: gmtraffic@msrtc.gov.in

दिनांक:-२२/१२/२०२३

क्र.राप/वाह/सवलत/ ५८३१

परिपत्रक क्र.९५/२०२३.

प्रति,

उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र. १/२/३

मुख्य अभियंता [सं.व.वि.]
मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी- पुणे

विभाग नियंत्रक,
रा.प.मुंबई/पालघर/रायगड(पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/अमरावती/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/ वर्धा/ गडचिरोली/ अकोला / यवतमाळ/ बुलडाणा विभाग.

यंत्र अभियंता चालन
रा.प.विभागीय कार्यशाळा, बारामती/श्रीरामपूर.

**विषय :- विविध सवलतधारी प्रवाशांना रा.प महामंडळाच्या ताफ्यातील बसेसमध्ये आसने राखीव ठेवणेबाबत.**

**संदर्भ :-** सुधारित परिपत्रक क्र.२०/२०१५, क्र.राप/वाह/सवलत/राखीव आसने/६२१८, दिनांक २६.१०.२०१५.

-------

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे विविध सामाजिक घटकांना [ज्येष्ठ नागरिक, महिला, अधिस्विकृतीधारक पत्रकार, स्वातंत्र्य सैनिक इ.] प्रवासभाड्यात सवलत देण्यात येते. रा.प.महामंडळाच्या बसेसमध्ये सदर सामाजिक घटकांना सेवा प्रकारनिहाय उदा.[साधी, निमआराम, विनावातानुकूलित शयनआसनी, शिवशाही [आसनी], मिडी, वातानुकूलित, व्होल्वो, शिवाई, विनावातानुकूलित शयनयान,] मध्ये राखीव आसने उपलब्ध करुन दिलेली आहेत. तसेच सेवा प्रकारामध्ये विविध आसनक्षमतेच्या बसेस चालनासाठी उपलब्ध आहेत.

सद्यस्थितीमध्ये रा.प.महामंडळात नव्याने ईटीआयएम-ओआरएस कार्यप्रणाली कार्यान्वित झालेली आहे. जुन्या कार्यप्रणालीमध्ये बसेसचे वेगवेगळे सीट लेआऊट उपलब्ध आहेत. तसेच बस प्रकारानुसार विविध सामाजिक घटकांना विविध बसेसमध्ये आसन क्रमांक देखील वेगवेगळे आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर तक्रारी निर्माण होऊ नयेत याकरीता आसन व्यवस्थेमध्ये एकसुत्रता आणण्याकरीता विविध सामाजिक घटकांचे आसन क्रमांक व सवलतधारी प्रवाशांकरीता ठेवण्यात येणा-या आसनांमध्ये बदल करणे गरजेचे होते. **आसनव्यवस्थेबाबत यापुर्वीचे सुधारित परिपत्रक क्र.२०/२०१५, क्र.राप/वाह/सवलत/राखीव आसने/६२१८, दिनांक २६.१०.२०१५ अधिक्रमित करण्यात येत आहे. तरी नवीन सुधारित बस प्रकारनिहाय आरेखन तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.**

..२..

## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा



श्री. किसनलालजी शर्मा (वय १०२), रा. अकोला यांच्या सत्कार प्रसंगी.



बोरिवली (मुंबई) येथील **श्रीमती सुमती रत्नाकर बाणावलीकर (वय १००)** यांचा अध्यक्षा रुचिरा दिघे यांच्या हस्ते सत्कार.




माहुली (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्रीमती वत्सलाबाई पांडुरंग सुतार (वय १०५)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने महसूल चे निवृत्त मंडलाधिकारी अब्दुल मोतीलाल अत्तार यांच्या हस्ते सत्कार.



**श्री. बाळकृष्ण आवादे (वय १००)**, रा. अकोला यांच्या सत्कार प्रसंगी.



नागेवाडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्रीमती हौसाबाई ज्ञानू निकम (वय १०५)** यांचा प.पू. साने गुरुजी संघाचे कार्यवाह सुनिल खलिपे यांच्या हस्ते सत्कार.



नागेवाडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्रीमती कमळाबाई कोंडीबा पवार (वय १०२)** यांचा प.पू. साने गुरुजी संघाचे कार्यवाह सुनिल खलिपे यांच्या हस्ते सत्कार.



नागेवाडी (सध्या गार्डी, ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्रीमती सोनाबाई तातोबा निकम (वय १०८)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान यांच्या हस्ते सत्कार.



बलवडी-भाळवणी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्री. शामराव केसू पवार (वय १०२)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने निवृत्त नायब तहसिलदार चंद्रकांत महाजन यांच्या हस्ते सत्कार.

## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा



सावर्डे (जि. सांगली) येथील **श्रीमती राधाबाई आकाराम पाटील (वय १०२)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान यांचे हस्ते सत्कार.



बुधगांव (ता. मिरज) सध्या तासगांव तालुक्यातील वाघापूर येथील **श्री. कृष्णा भिवा भगत पाटील (वय १०५)** यांचा सावर्डेचे ज्येष्ठ साहित्यिक मोहन माने यांचे हस्ते फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलचे वतीने सत्कार.



फेस्कॉम अध्यक्ष श्री. आण्णासाहेब टेकाळे यांच्या हस्ते चेंबूर (मुंबई) येथील **श्रीमती इंदुबाला रामकृष्ण कर्णिक (वय १००)** यांचे सत्कार प्रसंगी



तांदळगाव (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्री. ज्ञानदेव यशवंत चव्हाण (वय १०१)** यांच्या सत्कार प्रसंगी मनोयुवा कौन्सिलचे सदस्य यशवंतराव जगताप.



सनमडी (ता. जत) येथील **श्री. बिरा रामा महारनूर (वय १०२)** यांच्या सत्कार प्रसंगी मनोयुवा कौन्सिलचे सदस्य यशवंतराव जगताप.



कारेगाव (जि. नांदेड) येथील **श्री. बाबाराव दिघे पाटील (वय १०१)** व **सौ. रुक्मिणी बाबाराव दिघे पाटील (वय ९५)** यांचा सत्कार करताना महापालिका सदस्य सौ. सुनिता केंद्रे, शिक्षिका व इतर.



राजगुरुनगर (ता. खेड) येथील **श्री. तुकाराम नारायण मुटके (वय १०२)** यांच्या सत्कार प्रसंगी खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी


## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा



हिरडगाव (जि. अहिल्यानगर) **मा. माता अनुसया काळे (वय १०५)**
यांचा प्रा.वि. सचिव पांडुरंग दरेकर यांचे हस्ते सत्कार.



दिघवद जि. नाशिक येथील **श्री. भागुजी आबाजी निखाडे (वय १०२)**
यांचा प्रा.वि. अध्यक्ष अशोक नाना होळकर यांचे हस्ते सत्कार.





जय जनार्दन अनाथ व वृध्दाश्रम चे **मा. बहुरुपी बाबा (वय १०५)**, रा. नाशिक
यांच्या सत्कार प्रसंगी नाशिक प्रा.विभागचे अध्यक्ष अशोक होळकर.



**श्री. शंकर शिवराम जाधव (वय १०१)**, रा. निनाम (सातारा)
यांच्या सत्कार प्रसंगी.



**श्री. धोंडीराम ज्ञानदेव ढाणे (वय १०२)**, रा. पाडळी (सातारा)
यांच्या सत्कार प्रसंगी.



**श्रीमती राधाबाई गोविंदराव देशमुख (वय १०७)**, रा. अकोला
यांच्या सत्कार प्रसंगी.



**श्रीमती नलिनीबाई अरविंद देशपांडे (वय १०३)**, रा. अकोला
यांच्या सत्कार प्रसंगी.



राजगुरुनगर (ता. खेड) येथील **श्रीमती सोनाबाई शांताराम मेदनकर (वय १०१)**
यांच्या सत्कार प्रसंगी खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी

## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा




शेडगेवाडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्रीमती हिराबाई तुकाराम ठोंबरे (वय १०५)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे सदस्य यशवंतराव जगताप यांच्या हस्ते सत्कार.



**श्री. महादेव विठ्ठल देशपांडे (वय १०१), रा. सातारा** यांच्या सत्कार प्रसंगी.




तळेगाव (नांदेड) येथील **श्री. धोंडीबा महादू कोनाळे (वय १०२)** यांचा मेजर डॉ. निर्मला कोरे (भोसकर) ताई यांच्या हस्ते सत्कार.



**श्री. तात्या तुकाराम चोपडे (वय १००)** यांच्या सत्कार प्रसंगी.



**सोनाबाई भगवान जाधव (वय १११)**
रा. वैराग, जि. सोलापूर



**श्रीमती द्वारकाबाई कैलास चोपडे (वय १००)**
रा. होळे खुर्द, जि. सोलापूर



**श्री. ज्ञानदेव बंडा जाधव (वय १०१)**



सोलापूर जिल्ह्यातील वडशिंगे गावातील एकाच कुटुंबातील शतकवीरांचा पुणे प्रादेशिक विभागाचे वतीने अध्यक्ष हनुमंत कुंभार गुरुजी यांचे हस्ते सत्कार.
**१) मारुती दत्तोबा गुडेवार (वय १११), २) सौ. शांताबाई मारुती गुडेवार (वय १०६) ३) श्री. पांडुरंग दत्तोबा गुडेवार (वय १०१)**



तांदळगाव (ता. खानापूर, जि. सांगली) येथील
**श्रीमती इंदूबाई तुकाराम चव्हाण (वय १०५)** यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने निवृत्त नायब तहसिलदार चंद्रकांत महाजन यांच्या हस्ते सत्कार.

राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक
धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : व्हीआयपी-०८१८/ प्र.क्र. ४६४/ पोल-१३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १० सप्टेंबर, २०१८.

**वाचा** : शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: ज्येष्ठना २०१६/प्र.क्र. ७१/सामासू, दिनांक ९ जुलै, २०१८.

**परिपत्रक :-**

ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ९ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयान्वये , राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर धोरणाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. ज्येष्ठ नागरिकांचा विविध स्तरातून होणारा छळ, पिळवणूक, यापासून त्यांचे संरक्षण करण्यात यावे.

२. प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी तसेच पोलीस आयुक्तालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्प लाईनसुरू करण्यात यावी. याद्वारे आणिबाणीच्या वेळी ज्येष्ठ नागरिकांना तात्काळ आरोग्य सेवा आवश्यक सुचना तथा सुरक्षा विषयक मदत उपलब्ध करण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

३. ज्येष्ठ नागरिकांना आपत्कालीन परिस्थिती तातडीने मदत मिळण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करून आपात्कालीन सतर्क करणारी (Emergency Alert System) विकसित करण्यात यावीत. त्यामध्ये उदा. मोबाईल अलार्म, इंटरनेट, जी.पी.एस. याद्वारे सुरक्षेसाठी संपर्क केल्यास संकट समयी ज्येष्ठ नागरिकांना आहे त्या ठिकाणी मदत देणे शक्य होईल.

४. पोलीसांनी ज्येष्ठांची सुरक्षितता व अन्य प्रश्न यामध्ये जाणीवपूर्वक प्रयत्नशील राहण्यासाठी जागरूकता दाखवावी. ज्येष्ठ नागरिकांना होणारे विविध सतावणुकीसंबंधी (Elderly abuse) तक्रारी प्राधान्याने व खास लक्ष देऊन कायद्याच्या चौकटीत सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

५. आई वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम-२०१० च्या प्रकरण ६ मधील नियम २० मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या जिवितांचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याबाबत कृती आराखडा विनिर्दिष्ठ केला आहे. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्यात त्यांच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे विशेषत: एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची अद्ययावत यादी ठेवण्यात यावी.

६. पोलीस ज्येष्ठ नागरिकांवर मैत्रीपूर्ण लक्ष ठेवतील. पोलीस ठाण्याच्या प्रतिनिधीने सामाजिक कार्यकर्ता अथवा स्वयंसेवक यांच्यासह नियमितपणे एकाकी व अशक्त ज्येष्ठ नागरिकांनी सदिच्छा भेट द्यावी यासाठी पोलीसांनी सामाजिक संस्थांची मदत घ्यावी.(उदा. हेल्पेज इंडीया)

७. पोलीस घटक प्रमुख यांनी वरील सूचना सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्या सूचनांचे तंतोतंत पालन होईल यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी. तसेच, याच्या अंमलबजावणीचा आढावा गुन्हे बैठकीमध्ये घेण्यात यावा.

८. पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी यासाठी त्यांच्या कार्यालयात समन्वय अधिकारी (Nodal Officer) नेमावा व ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील उपरोक्त सूचनांच्या अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घ्यावा.

२. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०९१११४४०९२१२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(युवराज अजेटराव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

---

# मराठीच गुंजते सह्यागिरीतून इथल्या

मराठी असे ही जशी माझी माय
मराठीच वाटे मज दुधावरची साय
मराठी न पुसते कधी जात पात
मराठी न करी दुजाभाव मनुजात ।।१।।
मराठीच आहे आमुचा तो मोकळा श्वास
मराठीच आहे आमुचा अढळ विश्वास
मराठीच असती मुले आमुची दंग
मराठीच जगती, खेळती जीवनाचे रंग ।।२।।
मराठी उरी ह्दयात आमुच्या असे
मराठी शिरी मेंदूत आमुच्या असे
मराठी शिरी मेंदूत आमुच्या असे
मराठी मातीत जन्मणारी मुले आमुची
मराठीच बोलती, बाळबोध मुले आमुची ।।३।।
मराठीच जगल्या पिढ्या कैक आमुच्या
मराठीच जगतील पिढ्या कैक आमुच्या
मराठीच खेळते सवे मुलांच्याच आमुच्या ।।४।।
मराठीच दिसते बाग-फुलात इथल्या
मराठीच रुजते वंश-कुळात इथल्या
मराठीच खुलते गाव नगरात इथल्या
मराठीच हिंडते दश-दिशात इथल्या ।।५।।
मराठीच राज करते कर्मचाऱ्यात महाराष्ट्राच्या
मराठीच भिनली नसानसात महाराष्ट्राच्या
मराठीच गोड झाली मनामनात महाराष्ट्राच्या ।।६।।
मराठीच फुलते सर्व शिवारात इथल्या
मराठीच भिरभिरते पाखरातून इथल्या
मराठीच वाहते नदी-नाल्यातून इथल्या
मराठीच गुंजते सह्यागिरीतून इथल्या ।।७।।

– रंगराव शिंपुकडे

# फेस्कॉम नियामक मंडळ २०२४-२०२७

**१) श्री. आण्णासाहेब शहाजीराव टेकाळे (अध्यक्ष)**
ओम श्री सद्‌गुरू को-ऑप. सोसायटी, फ्लॅट नं. ६०५,
६ वा मजला, रतन आयकॉन बिल्डींग शेजारी, मनसे ऑफिस जवळ, सेक्टर ५०, नवीन सीवूड, नेरुळ (प.)
नवी मुंबई- ४००७०६
मोबा.नं. ७०२१२८८२८५
ई-मेल : annasaheb.tekale@gmail.com
जन्मतारीख : २ सप्टेंबर १९४७

**२) श्री. चंद्रकांत काशिनाथ महामुनी (मुख्य सचिव)**
स.नं.५४, गजाननगर, पिंपळे गुरव, पुणे ४११ ०६१
मोबा.नं. ९८२२४५२६७५/ ८९९९२८२४४१
ई-मेल : ckm.fescom@gmail.com
जन्मतारीख : २ जुलै १९४९

**३) श्री. अशोक पां. तेरकर (उपाध्यक्ष)**
४३, पहिला मजला, अलिभाई टॉवर,
शिवाजीनगर, नांदेड, जि.नांदेड ४३१६०२
मोबा.नं. ८०८०८२८२७४/ ९०११०७५०८१
ई-मेल : apterkar@gmail.com
जन्मतारीख : १८ नोव्हेंबर १९५१

**४) श्री. अंजुमन रशीद खान (उपाध्यक्ष व प्रमुख मनोयुवा कौन्सिल)**
अ/७, जलाराम चौक, मिरज मालगांव रस्ता,
सुभाषनगर, ता.मिरज, जि. सांगली ४१६४३७
मोबा.नं. ९४२२५८३००४
ई-मेल : anjuman.khan36@gmail.com
जन्मतारीख : १४ आक्टोबर १९४८

**५) श्री. प्रकाशराव प्रल्हादराव पिंपरकर (अति. मुख्य सचिव)**
अथर्व क्लिनिक, जुना अजिसपुर रोड, एकतानगर,
बुलढाणा, जि.बुलढाणा ४४३००१
मोबा.नं. ९६२३१३१२४१
ई-मेल : prakashpimparkar07@gmail.com
जन्मतारीख : ७ जून १९४८

**६) श्री. रत्नाकर लक्ष्मण मानकर (कोषाध्यक्ष)**
कृष्णकमळ हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं.पी-२/११,
कृष्णा रेसिडन्सी शेजारी, साई चौक, सुस रोड,
पाषाण, पुणे ४११०२१
मोबा.नं. ९८६०९०६७५१
ई-मेल : rlmankar@gmail.com
जन्मतारीख : १७ एप्रिल १९५२

**७) श्री. वसंत बा. कळंबे (अति. कोषाध्यक्ष)**
६०१, वाढोडा स्ट्रीट, स्कीम दर्शन कॉलनी
नंदनवन, नागपूर, जि.नागपूर ४४००२४
मोबा.नं. ९५८८४५१३८३
ई-मेल : vasantkamble01949@gmail.com
जन्मतारीख : १५ फेब्रुवारी १९४९

*** पदसिध्द सदस्य ***

**८) श्री.अरुण रोडे (माजी अध्यक्ष)**
३ अबोली अपार्टमेंट, वरदायिनी सोसायटी,
सुस रोड, पाषाण पुणे ४११०२१
मोबा.नं. ९८५०८८४३७५
ई-मेल : amrode1945@yahoo.com
जन्मतारीख : १२ फेब्रुवारी १९४५

**९) श्री.विवेक नारायण देशपांडे (मुख्यालय उपाध्यक्ष)**
अ-५ व ६, मोनालिला सोसायटी,
प्लॉट नं.आर.एम.-१, मिलापनगर,
गणेश विसर्जन तलावाजवळ, एम.आय.डी.सी.,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०३
मोबा.नं. ९८२०२५९४८२, ९०८२७२३१७७
ई-मेल : vivek15747@rediffmail.com
जन्मतारीख : १५ जुलै १९४७

**१०) डॉ. बी. आर. पाटील (संघटक सचिव)**
विठ्ठलनगर, एस.टी, डेपोचे मागे, खणी विभाग,
मु. पो. जि. लातूर - ४१३ ५१२.
मोबा. ९८२२४४९२५२
जन्म. दि. २९/०७/१९४९

**११) श्री. श्रीराम पुंडलिक कातकाडे (संपर्क सचिव)**
तुळसाई सदन, ६००/ब २, टिळक पथ, स्वा. वीर सावरकर जन्मभूमी, मु. पो. भगूर,
जि. नाशिक - ४२२ ५०२.
मो. ९१५६७८४३७६, ९५७९४६३१९७

---

**१. प्रादेशिक विभाग मुंबई**
**(जिल्हे- मुंबई, नवी मुंबई व इतर उपनगरे)**

**१) श्री. सुरेश ईश्वर पोटे (अध्यक्ष)**
सी-५०२, गहलोत मॅजेस्टी अॅन्ड अव्हेन्यू,
सेक्टर-४६ए, सीवुडस्, नवी मुंबई ४००७०६
मोबा.नं. ९३२२४०१९६५
ई-मेल : sureshipote@gmail.com
जन्मतारीख : ०१ आक्टोबर १९५५

**२) श्री. मुकुंद संभाजी फडतरे (सचिव)**
बी/१०४ करीरोड गणेश को.-ऑप. हौसिंग सोसायटी (जिम्ना अपार्टमेंट) ना.म. जोशी मार्ग, मुंबई ४०००१३
मोबा.नं. ९०२९५८०२८८
ई-मेल : mukundphadtare10@gmail.com
जन्मतारीख : १५ आक्टोबर १९५७

---

**२. प्रादेशिक विभाग कोकण**
**(जिल्हे- ठाणे/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ रायगड/पालघर)**

**१) श्री. विलास काळे (अध्यक्ष)**
जी- ०३, नवमयुर को. ऑप. हौसिंग सोसायटी,
१०१, टिळकनगर, लाला लजपतराय मार्ग,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१
मोबा.नं. ७३५०५७०७६१
ई-मेल : vilaskale67@gmail.com
जन्मतारीख : ०४ एप्रिल १९५१

**२) श्री. दिपक मधुकर करकरे (सचिव)**
०३/७०२, रिजेंसी ईस्टेट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
कल्याण शीड रोड, दावडी डोंबिवली (पूर्व) ४२१२०३
ई-मेल : d.karkare24@gmail.com
जन्मतारीख : १० नोव्हेंबर १९५४

---

**३. प्रादेशिक विभाग, पुणे**
**(जिल्हे- पूणे/ सातारा/ सोलापूर)**

**१) श्री. हनुमंत संभाजी कुंभार (गुरुजी) (अध्यक्ष)**
अण्णाई निवास दत्तनगर, मु.पो. मोडलिंब,
ता.माढा, जि. सोलापूर ४१३३०१
मोबा.नं. ९९२२८५२२३३
ई-मेल : hanumantkumbhar0205@gmail.com
जन्मतारीख : २ मे १९५१

**२) श्री. एकनाथ बाळासाहेब वाळुंज (सचिव)**
अविशा टेल्को कॉलनी नं.२, तिन्हेवाडी रोड,
मु.पो. राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे ४१०५०५
मोबा.नं. ९९७५४९९०५९
ई-मेल : eknath.walunj@gmail.com
जन्मतारीख : १ जुन १९६२

---

**४. प्रादेशिक विभाग खानदेश**
**(जिल्हे- जळगांव/ धूळे/नंदूरबार)**

**१) प्रा.भगवान नाटु पाटील (अध्यक्ष)**
३०, लक्ष्मीनगर, आय.टी.आय. च्या मागे,
देवपुर, धुळे ४२४ ००५
मोबा.नं. ७५८८७३६०३६/ ९४२१५३३७१०
ई-मेल : bnpatil2048@gmail.com
जन्मतारीख : २० ऑगस्ट १९४८

**२) प्रा. रामदास ताराचंद खैरनार (सचिव)**
प्लॉट नं.४२, श्रीगणेश नगर,
नकाणे रोड, देवपुर धुळे ४२४००२
मोबा.नं. ९४२१६१७२१३
ई-मेल : rtk042@gmail.com
जन्मतारीख : १ जून १९६१

---

**५. प्रादेशिक विभाग, उत्तर मराठवाडा**
**(जिल्हे- औरंगाबाद/ जालना/ नांदेड/ हिंगोली)**

**१) डॉ.हंसराज दादारावजी वैद्य (अध्यक्ष)**
वैद्य मॅटर्निटी व मुलांचा दवाखाना,
पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर,

वजिराबाद नांदेड, जि.नांदेड ४३१६०१
मोबा.नं. ९४२३१३८३८५/ ७८८७८३३९९८
ई-मेल : hansrajvaidya@gmail.com
जन्मतारीख : १५ सप्टेंबर १९४७

**२) श्री. प्रभाकर गंगाधरराव कुंद्रुकर (सचिव)**
दिलीपसिंग कॉलनी, भशीन मंगल कार्यालयाजवळ,
गोवर्धन घाट, नांदेड, जि. नांदेड ४३१६०१
मोबा.नं. ९६०४०६०९०२
ई-मेल : नाही.
जन्मतारीख : १५ ऑगस्ट १९५५

---

**६. प्रादेशिक विभाग, दक्षिण मराठवाडा**
**(जिल्हे- लातूर/ उस्मानाबाद/ बीड/ परभणी)**

**१) डॉ.दामोदर हरिभाऊ थोरात (अध्यक्ष)**
एकात्मता कॉलनी, यशवंतराव चव्हाण चौकाजवळ,
रिंग रोड, मु.पो. अंबाजोगाई, जि.बीड ४३१५१७
मोबा.नं. ९८२२२८००३२
ई-मेल : damodharthorat@gmail.com
जन्मतारीख : ६ ऑगस्ट १९४८

**२) श्री. जगदिश किशनलाल जाजू (सचिव)**
प्लॉट नं.३, हैद्राबाद बँक कॉलनी,
रिंग रोड, अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई
जि. बीड ४३१५१७
मोबा.नं. ९४२२४२७७८३
ई-मेल : jagdishkjaju@gmail.com
जन्मतारीख : ११ जानेवारी १९६४

---

**७. प्रादेशिक विभाग, विदर्भ (पश्चिम)**
**(जिल्हे- अकोला/अमरावती/यवतमाळ/ वाशिम)**

**१) श्री. पुरुषोत्तम तुळशीराम गावंडे (अध्यक्ष)**
करडे ले-आऊट, कठोरा रोड,
पोस्ट व्ही.एम.व्ही. अमरावती,
जि.अमरावती ४४४६०४
मोबा.नं. ८२७५०४९२५६
ई-मेल : ptgawandeamt88@gmail.com
जन्मतारीख : ८ ऑगस्ट १९४७

**२) श्री.पांडुरंग विठोबाजी ढुमणे (सचिव)**
२ ब समनानी नगर, वडगांव ग्रामपंचायतीचे मागे,
आर्णी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ ४४५००१
मोबा.नं. ९४२३६६४८००
ई-मेल : 1953pandurang@gmail.com
जन्मतारीख : ०१ जुलै १९५३

---

**८. प्रादेशिक विभाग, विदर्भ (पूर्व)**
**(जिल्हे- नागपूर/ भंडारा/ वर्धा)**

**१) श्री. सुधीर यशवंत भगत (अध्यक्ष)**
पत्ता- प्लॉट नं.९, फ्लॅट नं.५०२, पायोनियर ट्युलीप अपार्टमेंट, जयतारा रोड, जयतारा, नागपूर ४४००३६
मोबा.नं. ९४२०५६५२२३
जन्मतारीख : ३१ डिसेंबर १९४८

**२) डॉ. दिपक शेंडेकर (सचिव)**
पत्ता- १३३, गजानननगर, न्यू म्हाळगीनगर,
हुडकेश्वर रोड, नागपूर ४४००३४
मोबा.नं. ९४२२१८७५६३, जन्म दि. ०२/०९/१९५७
E-mail : deepakshendekar@gmail.com

---

**९. प्रादेशिक विभाग, वनवैभव**
**(जिल्हे- चंद्रपूर/ गडचिरोली/ गोंदिया)**

**१) श्री. विजयराव बाबुराव चंदावार (अध्यक्ष)**
गोल बाजार वॉर्ड, कस्तुरबा रोड,
मु.पो. चंद्रपुर, जि. चंद्रपुर ४४२४०२
मोबा.नं. ७९७२६२२६१८
ई-मेल : vijaychanda1944@gmail.com
जन्मतारीख : १८ नोव्हेंबर १९४४

**२) श्री.अशोक नारायणराव संगीडवार (सचिव)**
तुकुम जनरल स्टोअर्सजवळ, ताडोबा रोड,
मु.पो. चंद्रपुर, जि. चंद्रपुर ४४२४०२
मोबा.नं. ९३७३९३५२८८
ई-मेल : ashoksangidwar@gmail.com
जन्मतारीख : ३० जुलै १९५०

---

**१०. प्रादेशिक विभाग, नाशिक**
**(जिल्हा – नाशिक)**

**१) श्री. अशोक नाना होळकर (अध्यक्ष)**
पत्ता- मु.पो. लासलगाव, ता.निफाड, जि.नाशिक
मोबा.नं. ९८२३८१७१७६
जन्मतारीख : १५ फेब्रुवारी १९४५
**२) श्री.धनंजय बाबुराव चतुर (सचिव)**
पत्ता- वास्तु क्लासिक हौसिंग सोसायटी,
सी-१३, गणेशनगर, काठे गल्ली,
द्वारका नासिक ४२२०११, मोबा.नं. ९८२२०३१८३५
ई-मेल : dhananjaydchatur@gmail.com
जन्मतारीख : १० ऑक्टोंबर १९५३

---

**११. प्रादेशिक विभाग, अहमदनगर**
**(जिल्हा – अहमदनगर)**

**१) श्री. हाजी शब्बीरखान हैदरखान पठाण (अध्यक्ष)**
मु.पो. कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर ४१४ ४०२.
मोबा.नं. ९९६०२७४५२४
जन्मतारीख : ०१ जानेवारी १९४५
**२) श्री.पांडुरंग जयवंत दरेकर (सचिव)**
मु.पो. हिरडगाव, ता.श्रीगोंदा,
जि.अहमदनगर – ४१३ ७०१.
मोबा.नं. ९४२२६७४३५८
जन्मतारीख : ०३ ऑगस्ट १९४९

---

**१२. प्रादेशिक विभाग, बुलढाणा**
**(जिल्हा – बुलढाणा)**

**१) श्री. अशोक रामराव खेडेकर (अध्यक्ष)**
शिक्षक कॉलनी, जिजामातानगर,
बुलढाणा, जि.बुलढाणा ४४३००१
मोबा.नं. ८७८८१५७०३१
ई-मेल : ashokhedekar61@gmail.com
जन्मतारीख : १६ नोव्हेंबर १९५५
**२) श्री. दिलीप शंकरराव कुलकर्णी (सचिव)**
गंगा पार्क, विष्णुवाडी, राधिका हॉटेलजवळ,
बुलढाणा, जि.बुलढाणा ४४३००१
मोबा.नं. ८३९०७७९५०५ जन्मतारीख : ११ जून १९५८
ई-मेल : dilipkulkarnix@gmail.com

---

**१३. प्रादेशिक विभाग, कोल्हापूर**
**(जिल्हा – कोल्हापूर)**

**१) श्री.रामचंद्र ईश्वरा पाटील (अध्यक्ष)**
मु.पो. सावर्डे (बु.।।) ता.कागल,
जि.कोल्हापूर ४१६२१९
मोबा.नं. ९३७१२७०६४२
ई-मेल : ripatil1435@gmail.com
जन्मतारीख : ०१ जून १९५८
**२) श्री.अशोक लक्ष्मण तोडकर (सचिव)**
मु.पो. अर्जुननगर, ता.कागल,
ज.कोल्हापूर ५९१२३७
मोबा.नं. ९६३२७२५६१८
ई-मेल : todkarashok25@gmail.com
जन्मतारीख : २५ नोव्हेंबर १९६०

---

**१४. प्रादेशिक विभाग, सांगली**
**(जिल्हा – सांगली)**

**१) श्री.यशवंतराव नानासाहेब चव्हाण (अध्यक्ष)**
मोरे कॉलनी, कोर्टा मागे, जत, जि.सांगली ४१६४०६
मोबा.नं. ९४२११३०२३४
ई-मेल : नाही.
जन्मतारीख : ०२ जून १९५०
**२) श्री.विष्णु महादेव शिनगारे (सचिव)**
मु.पो. येलुर, ता.वाळवा, जि.सांगली ४१५४११
मोबा.नं. ९२७०००१०४१
ई-मेल : shingarevishnu1950@gmail.com
जन्मतारीख : ०१ जून १९५०

**स्विकृत सदस्य** (एकूण ५ पैकी १ महिला)
१) श्री. डी.एन.चापके, बेलापूर
२) श्री. डी.टी.चौधरी, जळगाव
३) श्री. नाना इंगळे, अकोला
४) श्री. बाळकृष्ण वाणी,जळगाव
५) डॉ. सुरेखा देशमुख, हिंगणघाट वर्धा

**सल्लागार समित्या व प्रमुख**

**१) संशोधन व विकास - कार्यविस्तार**

डॉ. सौ.सुशिला ओडेयर, रा. कोल्हापूर

मोबा. ८४०८०८४४००

**२) कायदा व नियतकालिन घटना**

श्री. प्रमोद ढोकळे, रा. ठाणे

मोबा. ९८२०६८०७८८

**३)अर्थ व निधी संकलन**

श्री. श्याम पेशवे काका, रा. जेजुरी - पूणे

**४) अंतर्गत तपास अधिकारी**

श्री. विनायक पांडे, रा. अकोला

मोबा. ९४२२८६१७१०

**५) फेस्कॉम महिला आघाडी**

सौ. मेजर निर्मला कोरे, रा. नांदेड

मोबा. ९९६०७७५५९१

**६) जनसेवा कल्याण समिती**

श्री. सखाराम भालेराव, रा. आंबेगाव- पूणे

**७) फेस्कॉम डिजिटल ॲकॅडमी**

डॉ. विनिता केळकर, रा. पालघर

मोबा. ९६८९९६३५६३

**८) वृध्दाश्रम व विरंगुळा समिती**

श्री.प्रभाकर कापसे, रा. लातूर

मोबा. ८०५५३७०७७५

**९) आरोग्य समिती**

डॉ. मिलिंद सरदार, रा. पुणे

मोबा. ९२७५५५८४७०

**१०) ग्रामीण विकास समिती**

प्रा.बी.डी.फराकटे, रा. कागल (कोल्हापूर)

मोबा. ९८६०७६६९४७

**११) फेस्कॉम प्रसिध्दी समिती**

श्री. सुरेश पवार, रा.लासलगाव (नाशिक)

मोबा. ९४२३९६७५२०

**१२) जनसंपर्क व माध्यम सल्लागार समिती**

श्री.राजीव कुलकर्णी (माजी सहसंपादक लोकसत्ता) ठाणे

मोबा. ९९८७५५९५००

**१३) फेस्कॉम जनसंपर्क कक्ष मुख्यालय नेरूळ, नवी मुंबई**

श्री. प्रभाकर गुमास्ते रा. नेरूळ, नवी मुंबई

मोबा. ९८७०६७५९१०

**१४) फेस्कॉम अधिवेशन ज्या प्रादेशिक विभागात होईल त्या प्रादेशिक विभागातील प्रायोजक संघ/समन्वय समिती पदाधिकारी पैकी एक प्रतिनिधी.** (अधिवेशनाचा कालावधी संपेपर्यंत)

श्री. प्रकाशा गादगिणे, रा. लातूर

मोबा, ९४२१६९५४५४

वरील समित्यांचे फक्त प्रमुखच नियामक मंडळाचे सभेस उपस्थित राहू शकतील.

**निमंत्रित सदस्य**

१) श्री. श्यामसुंदर पाटील, डोंबिवली ठाणे.

२) श्री. शरद डिचोलकर, मुंबई

३) श्री. नारायण वाढोणकर, नांदेड

४) श्री. अरविंद वाळवेकर, नवी मुंबई

५) डॉ. सुधाकर रामभाऊ पाटील, रावेर, जळगाव.

* * *

## 'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा




पळशी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील
**श्रीमती कृष्णाबाई सजाबा कदम (वय १०२)**
यांचा मनोयुवा कौन्सिलचे वतीने सह जिल्हा निबंधक
श्री. धनंजय जोशी यांच्या हस्ते सत्कार.



मोडनिंब (ता. माढा) येथील
**ह.भ.प. श्री. अंबादास भिवा खंदारे (वय १०४)**
यांचा श्री. विष्णु बांडगुळे यांच्या हस्ते सत्कार.



इस्लामपूर (सांगली) येथील **श्रीमती जरीना अब्दुल शेख (वय १११)**
यांचा सत्कार करतांना तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष
अशोक पाटील व इतर.



नागज (ता. कवठे महांकाळ) येथील **श्री.बापू रावजी हाक्के (वय १०३)**
यांचा मनोयुवा कौन्सिल चे वतीने सत्कार करतांना फेस्कॉम
उपाध्यक्ष अंजुमन खान व इतर.



बेळंकी (मिरज) येथील **श्री.पांडुरंगराव रामचंद्रराव गायकवाड (इनामदार) (वय ११७)**
यांचा मनोयुवा कौन्सिल चे वतीने सत्कार करतांना फेस्कॉम उपाध्यक्ष
अंजुमन खान व इतर.



धावडवाडी (ता.जत) येथील **श्री.हाशिम दादा कमते (वय १०२)**
यांचा मनोयुवा कौन्सिल चे वतीने सत्कार करतांना
फेस्कॉम उपाध्यक्ष अंजुमन खान व इतर.

‘फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी’ या संकल्पनेनुसार वयाची शंभरी पार केलेल्या ज्येष्ठांचे त्यांच्या घरी केलेले सत्कार व शुभेच्छा




पालवण (ता. माढा) येथील **श्रीमती रहिबाई आप्पाराव पाटील (वय १०१)** यांचा पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष हनुमंत कुंभार गुरुजी यांच्या हस्ते सत्कार.



राजगुरुनगर (ता. खेड) येथील **श्रीमती सुगंधाबाई महादेव घुमटकर (वय १००)** यांच्या सत्कार प्रसंगी खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी.



रेणावी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील **श्री. पांडुरंग बापू यादव (वय १००)** यांचा रेणावीचे उपसरपंच कुमार दिनकर पवार यांच्या हस्ते सत्कार.



शेगाव (ता. जत) येथील **श्रीमती यमनाबाई धोंडिबा सागर (वय १०७)** यांचा सत्कार करताना मनोयुवा कौन्सिलचे सदस्य यशवंतराव जगताप आणि दत्तात्रय बुरुटे.



नांदेड येथील **श्री. विठ्ठलराव तुकाराम जाधव (वय १०६)** यांचा इंजि. श्री. सुरु फाजगे यांच्या हस्ते सत्कार. सोबत फेस्कॉमचे पदाधिकारी.



भालके (नांदेड) येथील **श्री. वैजनाथ दशरथ पवार व सौ. सोनाबाई वैजनाथ पवार** यांचा इंजिनिअर श्री. ओंकार संग्राम सांगले यांच्या हस्ते सत्कार.

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले /पोस्टमन बीट क्र. ☐

**PRINTED MATTER**

प्रति,


प्रेषक :

**श्री. अंजुमन खान**

**फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल**
**अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ४३७.**
**मोबा. ९४२२५८३००४**